# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई.

**यांचे कार्यालय**

कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) (बी-१) अन्वये आदेश**

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/क.७७ अ (१) (बी-१)/ ९१४/सन-२०१८

दिनांक :- ८/५/२०१८

वाचावे :-१)महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) (बी-१) मधील तरतुद

२) संस्थेने या कार्यालयास सादर केलेले दिनांक १९/१/२०१८,व दिनांक २१/४/२०१८ रोजीचे २ पत्र

ज्याअर्थी त्रिकुटा टॉवर्स को ऑप हौसिंग सोसा लि, ऑफ आदी शंकराचार्य मार्ग , सनसिटी कॉम्प्लेक्स जवळ, पवई,मुंबई -७६ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक एमयुएम/डब्ल्युजीएस/एचएसजी/टीसी/१०१४४/२०११-१२ सन२०११ दिनांक २०/६/२०११ असा आहे .सदर संस्था एस विभागात कार्यरत असल्याने या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते .आणि,

ज्याअर्थी त्रिकुटा टॉवर्स को ऑप हौसिंग सोसा लि, ऑफ आदी शंकराचार्य मार्ग . सनसिटी कॉम्प्लेक्स जवळ, पवई,मुंबई -७६ (यापुढे संस्था असे वाचावे ) या संस्थेचा कारभार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मंजूर उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परीपत्रके यामधील तरतुदीनुसार चालविला जाणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेने या कार्यालयात दिनांक २५/४/२०१८ रोजीचे अर्जामध्ये नमुद केले आहे की संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये काही सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे फक्त ५ कमिटी मेंबर सदयस्थितीत कार्यरत आहेत.संस्थेच्या व्यवस्थापक समितीतील रिक्त झालेल्या जागांमुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीचा कोरम अल्पमतामध्ये आलेला आहे.तसेच संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या रचनेमध्ये दोष निर्माण होऊन व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली असुन संस्थेचे कामकाज ठप्प झालेले असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास येत आहे .आणि,

6 may 2018 letter

Scanned by CamScanner

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ अ(१) (बी-१) मध्ये समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे ,कोरम अल्पमतामध्ये आलेला आहे किंवा समितीचे कामकाज ठप्प झालेले आहे अथवा व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली असल्यास निबंधकास आदेशाव्दारे नवीन समिती पदग्रहण करेपर्यत संस्थेचे कामकाज पाहणेसाठी एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी नेमता येतील .तसेच त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे किंवा सदर बाबत व्यवस्थापक समिती सदस्यांना कारणे दाखवा नोटीस प्रसिध्द करणे व्यवहार्य नाही याबददल निबंधकाची खात्री होईल अशा कोणत्याही प्रकारची नोटीस प्रसिध्द करणे आवश्यक असणार नाही अशी तरतुद आहे .आणि,

ज्याअर्थी उपरोक्त परिस्थिती विचारात घेता संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये काही सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे फक्त ५ कमिटी मेंबर सदयस्थितीत कार्यरत आहेत.संस्थेच्या व्यवस्थापक समितीतील रिक्त झालेल्या जागांमुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीचा कोरम अल्पमतामध्ये आलेला आहे.तसेच संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या रचनेमध्ये दोष निर्माण होऊन व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली असल्याने संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही करणे या कार्यालयास अनिवार्य झालेले आहे .आणि,

त्याअर्थी उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संस्थेचे दैनंदिन कामकाज तातडीने चालू होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ अ(१) (बी-१) मधील तरतुदीनुसार संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याबाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे .

आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ अ(१) (बी-१) मधील तरतुदीनुसार मी, राजेश लव्हेकर , सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था,एस विभाग,मुंबई याव्दारे त्रिकुटा टॉवर्स को ऑप हौसिंग सोसा लि, ऑफ आदी शंकराचार्य मार्ग , सनसिटी कॉम्प्लेक्स जवळ, पवई,मुंबई -७६ या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री सतीश काकडे, प्रमाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे .

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक घेऊन नवनियुक्त व्यवस्थापक समितीकडे पदभार हस्तांतरीत करावा.

Scanned by CamScanner

सदरचा आदेश आज दिनांक ८/५/२०१८ रोजी माझी स्वाक्षरी व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे .

दिनांक :- ८/५/२०१८
ठिकाण :-मुंबई

( राजेश लव्हेकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग,मुंबई

प्रत :-

१)चेअरमन/सेक्रेटरी/खजीनदार व व्यवस्थापक समिती सदस्य,
त्रिकुटा टॉवर्स को ऑप हौसिंग सोसा लि, ऑफ आदी शंकराचार्य मार्ग , सनसिटी कॉम्प्लेक्स जवळ, पवई,मुंबई -७६

२/- आपणास कळविण्यात येते की आपण तात्काळ संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२)श्री श्री सतीश काकडे, प्रमाणित लेखापरीक्षक, त्रिकुटा टॉवर्स को ऑप हौसिंग सोसा लि, ऑफ आदी शंकराचार्य मार्ग , सनसिटी कॉम्प्लेक्स जवळ, पवई,मुंबई -७६

२/- आपणास कळविण्यात येते की आपण तात्काळ संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा घेऊन तसे या कार्यालयास अवगत करावे .

३)मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, शाखा विक्रोळी/भांडुप/कांजूरमार्ग (पुर्व/पश्चिम )

४)निवड नस्ती

सहाय्येक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग,मुंबई

Scanned by CamScanner